**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
**PHONE**: EPABX – 0091-0231-2609000 COE Office: 0231-2693176
Engg.Exam.Section: 0231-2609122 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
Estd: 1962
NAAC 'A' Grade
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
**दूरध्वनी : ; ईपीएबीएक्स** 0091.0231.2609000 **संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ:** 0231.2693176
अभियांत्रीकी व तंत्रज्ञान परीक्षा विभाग : 0231.2609122
वेबसाईट : (www.unishivaji.ac.in) ई मेल coe@unishivaji.ac.in

---संदर्भ

क्र. शिवाजी वि./अभियांत्रिकी व तंत्रज्ञान परीक्षा/ 182

दिनांक– 10 OCT 2020

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय – अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेचे वेळापत्रकाबाबत.**

**संदर्भ – या कार्यालयाचे शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/334 दि. 08 ऑक्टोबर, 2020 चे पत्र.**

महोदय/महोदया,

आपणास अवगत करणेत येते की, उन्हाळी सत्रातील आयोजित करावयाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेचे वेळापत्रक सोबत पाठविण्यात येत आहे. सदरचे वेळापत्रक सर्व संबंधित विद्यार्थी व शिक्षक यांच्या निदर्शनास आणावे. तसेच परीक्षक नियुक्ती विभागाने यापूर्वी पाठविणेत आलेल्या खालील संदर्भाकिंत परिपत्रकामध्ये सुचित केलेनुसार परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांचे मार्फत करणेची आहे.

1. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/301 दि. 11 सप्टेंबर, 2020 चे परिपत्रक.
2. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/304 दि. 14 सप्टेंबर, 2020 चे परिपत्रक.
3. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/305 दि. 16 सप्टेंबर, 2020 चे परिपत्रक.

कळावे,

आपला विश्वासू

श्री. ग. र. पळसे
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे
प्रत : 1) मा. प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
2) उपकुलसचिव, ऑन परीक्षा
3) उपकुलसचिव, पोस्ट परीक्षा
4) उपकुलसचिव, प्री परीक्षा
5) परीक्षक नियुक्ती विभाग
6) प्रश्नपत्रिका वितरण विभाग
7) गोडावून विभाग
8) परीक्षा प्रमाद विभाग.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

Estd. 1962
NAAC 'A' Grade

**(अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी प्रवेशित असणा–या नियमित विद्यार्थ्यांच्यासाठी)**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. 28 ऑगस्ट, 2020 रोजी दिलेल्या आदेशानुसार व त्या अनुषंगाने मा. कुलपती तथा राज्यपाल व महाराष्ट्र शासनाने दि. 03 सप्टेंबर, 2020 रोजी सूचित केल्याप्रमाणे **अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी नियमित प्रवेशित असणा–या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या लेखी** परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम वर्ष/सत्राच्या सर्व अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे बाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 10 ऑक्टोंबर, 2020 पासून सुरू होतील. (सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्र जाहीर करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना वेळापत्रक व हॉलतिकीट संगणक प्रणालीमधून उपलब्ध करून देण्यात येईल)
2. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने Online/Offline स्वरूपात संगणक प्रणालीमधून होईल.
3. सदर परीक्षा Online संगणक प्रणालीमधून होणार असल्याने परीक्षेस प्रविष्ठ होणा–या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालयामार्फत/अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अपडेट करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेसाठी आपला स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक संबंधीत अभ्यासकेंद्राकडून दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अद्ययावत करण्यात यावा.

   **(विशेष सूचना – सदरची माहिती परीक्षेकामी वापरण्यात येणार असल्याने अचूक माहिती देणेची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. तसेच विद्यार्थ्यांनी यासाठी परस्पर विद्यापीठाशी संपर्क करू नये.)**
4. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.

**(गजानन पळसे)**
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**संदर्भ क्र..: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/301**
**दिनांकः–11 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

## (अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी प्रवेशित असणा–या नियमित विद्यार्थ्यांच्यासाठी)

अंतिम वर्ष/अंतिम सत्रासाठी नियमित प्रवेशित असणा–या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेच्या आयोजनाबाबत शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/301, दिनांकः–11 सप्टेंबर, 2020 च्या परिपत्रकानुसार करावयाची कार्यवाही कळविण्यात आलेली आहे. सदर परिपत्रकामध्ये मुदद्ा क्रं. 3 मध्ये परीक्षेस प्रविष्ठ होणा–या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वतःचा ईमेल व मोबाईल क्रमांक महाविद्यालयामार्फत/अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीमध्ये दि. 17 सप्टेंबर, 2020 पर्यंत अपडेट करणे आवश्यक आहे. असे कळविण्यात आले होते. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास कळविलेले फोन नंबर व ईमेल आयडी अद्ययावत करणे अपेक्षीत आहे. यासाठी महाविद्यालयांनी www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Exam Portal ⟹ Update Students Mobile & Email address --- Use College/Department login to update data ⟹ Use College/Department Login ⟹ Please Type PRN No. ⟹ Update Student Mobile No./Email ID या लिंक वर जाऊन माहिती अद्ययावत करणेत यावी.

वरील माहिती फक्त उन्हाळी 2020 साठी अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अद्ययावत करण्यात यावी.

(गजानन पळसे)
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**संदर्भ क्र..: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/**304
**दिनांकः–14 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

Estd. 1962

NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

# परिपत्रक

**विषय :- उन्हाळी सत्र २०२० मधील अंतिम वर्षातील / अंतिम सत्रातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्र परीक्षा/परीक्षांचे काही विषय अनुत्तीर्ण असतील तर (Backlog) अशा विद्यार्थ्यांच्या त्या परीक्षा (अंतिम वर्ष/ अंतिम सत्र वगळून) संबंधित महाविद्यालयांनी/विद्यापीठ अधिविभागांनी घ्यावात. या सर्व प्रकारचे नियोजन महाविद्यालय/ विद्यापीठ अधिविभाग स्तरावर करण्यात येऊन त्यांचे गुण विद्यापीठाने कळविलेनुसार विद्यापीठाच्या संगणक प्रणालीतून सादर करण्यात यावेत.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित विषयांच्या (Backlog Subjects) परीक्षांचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. तसेच नियमित (Regular) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक २० ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. या परीक्षा Online/Offline बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरूपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एकतास) कालावधीच्या राहतील.

३. अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या नियमित (Regular), पुन:परीक्षार्थी (Repeater), अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांच्या समसत्राच्या परीक्षा दिनांक १३ मार्च, २०२० पर्यत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होतील. अंतिम पूर्व वर्षाच्या/सत्राच्या पुन:परीक्षार्थी (Repeater), विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर होतील. या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरूपात आयोजित करण्यात येतील.

४. सदर महाविद्यालय/अधिविभाग स्तरावरील अनुशेष (Backlog) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. http: //www.unishivaji.ac.in/exam/final-year-exam-2020 या लिंक वर सदरची माहिती उपलब्ध राहील. महाविद्यालयांनी अनुशेष विद्यार्थ्यांचे (Backlog) परीक्षाचे वेळापत्रक PDF स्वरूपात समन्वयक, इंटरनेट कक्ष webmaster@unishivaji.ac.in यांचे कडे पाठविणेचे आहे (दूरध्वनी ०२३१-२६०९३६६). विद्यापीठाच्या इंटरनेट कक्षाकडून महाविद्यालयाचे वेळापत्रक जिल्हानिहाय कोष्टक करून महाविद्यालयानुसार संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

महाविद्यालयांनी सदरचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याची खात्री करावी. तसेच परिक्षेचे वेळापत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांपर्यत पोहचावावे.

५. जे विद्यार्थी Offline चा पर्याय निवडतील त्यांच्यासाठी OMR Sheet चा वापर करून Offline पध्दतीच्या परीक्षांचे आयोजन हे महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोव्हिड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सूरक्षित अंतर ठेवून, विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालये - संस्थांमध्ये घेण्यात येतील.

६. अपरिहार्य कारणास्तव जे विद्यार्थी अंतिम वर्ष/अंतिम सत्राची नियमित (Regular) अथवा अनुशेषित (Backlog) विषयांची परीक्षा देवू शकणार नाहीत. त्याची परीक्षा व वेळापत्रक विद्यापीठाकडून नंतर जाहीर करण्यात येईल.

७. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअरमार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन खंड पडला तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.

८. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षाचे आयोजन (Mock Test / Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी करण्यात येईल.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील.

१०. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न(MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

११. महाविद्यालय/अधिविभागामध्ये परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

१२. उपरोक्त परीक्षांशी संबंधित प्रात्यक्षिक/प्रबंध/प्रकल्प/मौखिक परीक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न बोलविता ऑनलाईन स्वरूपात घेण्यात याव्यात. तसेच या परीक्षा दि. १५ सप्टेंबर, २०२० पासून आयोजित करून त्याचे गुण विद्यापीठाच्या उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीमध्ये ०१ ऑक्टोबर २०२० पर्यत भरून तसा अहवाल गुणयादयांसहित संबंधित ऑन परीक्षा विभागाकडे सादर करण्यात यावा.

१३. अंतिम वर्षाच्या उपरोक्तप्रमाणे घेण्यात येणा-या सर्व परीक्षांचे निकाल शासन निर्देशाप्रमाणे विहित मुदतीत जाहिर करणेसाठी सर्व संबंधित घटकांचे सहकार्य घेण्यात यावे.

१४. प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणा-या अडचणीचे निवारण करण्याकरिता समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून त्याचा तपशील स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

१५. प्रात्यक्षिक परीक्षा/viva voce विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलवता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा संबंधित अधिविभागप्रमुख/संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आलेली आहे. प्रात्यक्षिक परीक्षा/viva voce इ.घेण्यासाठी Skype अथवा अन्य Meeting Apps अशा तत्सम पर्यायाचा वापर करण्यात यावा.

१६. दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेशित विद्यार्थ्यांची अंतिम वर्ष/अंतिम सत्राची परीक्षा Online/Offline पध्दतीने होईल तसेच अनुत्तीर्ण, अनुशेष विषयांची परीक्षा संबंधित महाविद्यालयामार्फत/ Online/ Offline पध्दतीने आयोजित करण्यात येईल.

१७. P.G.Diploma, Diploma Certificate पध्दती इ. च्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठ प्रणालीमधून केले जाईल व अनुतीर्ण/अनुशेष विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन संबंधित अधिविभाग/महाविद्यालयामार्फत केले जाईल. रविवार दि. ११ ऑक्टोबर २०२० रोजी राज्यसेवा पूर्व परीक्षा व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा होणार असल्या कारणाने सदर दिवशी व राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी कोणत्याही परीक्षांचे आयोजन करण्यात येवू नये.

१८. कोव्हिड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतुदी या फक्त शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीच असतील.

मा.अधिविभाग प्रमुख,मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना Online पध्दतीने परीक्षा देण्यासाठी मार्गदर्शन/प्रोत्साहन दयावे. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या अधिविभागातील, आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

( गजानन पळसे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र..: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/305**
**दिनांकः–16 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.**

**Circular No. 921 & Summer Session Online/Offline Exam.Of March 2020**

**Revised Final Programme of the Final Year B. Tech. - Semester - VIII Examination of Summer Session to be held on Oct.2020**

**(Old Credit System)Course Code 149**

**(Time :- 11.00 a.m. To 12.00 p.m.)**

**Exam Type :- MCQ**

**The offline examination will be held at the Department of Technology, Shivaji University kolhapur.**

| Day & Date | Branches | Paper | Code |
|---|---|---|---|
| 17.10.2020 Saturday | 1. Electronics & Comm. Technology | Broadband Communication | 64437 |
| | 2. Computer Science & Technology | Mobile Technology | 64362 |
| | 3. Chemical Technology | Energy Conversion in Chemical Industries | 64387 |
| | 4. Mechanical Engineering | Automobile Engineering | 64576 |
| | 5. Food Technology | Post Harvest Technology of Plantation Crops | 64490 |
| | 6. Civil Engineering | Design of RCC Structure - II | 66756 |
| 19.10.2020 Monday | 1. Electronics & Comm. Technology | Satellite Communication | 64612 |
| | 2. Computer Science & Technology | Information Security | 64363 |
| | | Software Testing and Quality Assurance | 64394 |
| | 3. Chemical Technology | Process Modeling and Simulation | 64388 |
| | 4. Mechanical Engineering | Total Quality Management | 64577 |
| | 5. Food Technology | Design & Development of New Products | 64491 |
| | 6. Civil Engineering | Town and Country Planning | 66757 |
| 20.10.2020 Tuesday | 1. Electronics & Comm. Technology | Antennas & Radar Engineering | 64439 |
| | 2. Computer Science & Technology | Soft Computing | 64364 |
| | 3. Chemical Technology | Special Chemical Technologies - II | 64389 |
| | 4. Mechanical Engineering | Mechatronics and Robotics | 64578 |
| | 5. Food Technology | Waste Management of Food Industries | 64492 |
| | | Industrial Economics and Management | 64493 |
| | 6. Civil Engineering | Construction Practices | 66758 |
| 21.10.2020 Wednesday | 1. Electronics & Comm. Technology | ARM & Embedded Systems | 64440 |
| | 2. Computer Science & Technology | Data Mining & Warehousing | 64366 |
| | 3. Chemical Technology | Transport Phenomena | 64390 |
| | 4. Mechanical Engineering | Power Plant Engineering | 64579 |
| | 5. Food Technology | Food Plant Design and Layout | 64498 |
| | 6. Civil Engineering | EL-2 Water Resources Planning & Management | 67112 |
| | | Advanced Water & Waste Water Treatment | 67049 |
| 22.10.2020 Thursday | 1. Electronics & Comm. Technology | Fuzzy Logic and Applications | 64441 |
| | | High Speed Digital Design | 64442 |
| | | Digital Image Processing | 64443 |
| | 2. Computer Science & Technology | Industrial Management | 64368 |
| | | Real Time Operating System | 64369 |
| | | Optimization Techniques | 64370 |
| | 3. Chemical Technology | Petrochemical Technology | 64615 |
| | | Industrial Biotechnology | 64616 |
| | | Polymer Technology | 64617 |
| | | Food Process Technology | 64618 |
| | | Environmental Chemistry & Biochemistry | 64619 |
| | 4. Mechanical Engineering | CFD - Computational Fluid Dynamics | 64580 |
| | | Vibration & Noise | 64581 |
| | | Nano Technology | 64582 |
| | | Machine Tools Design | 64583 |
| | 5. Food Technology | Flavors Technology | 64494 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Snack Foods Technology | 64495 |
| | | Sugar Technology | 64496 |
| | | Energy Systems & Technology | 64497 |
| | 6. Civil Engineering | EL-3 Water Power Engineering | 67331 |

**Final Year B. Tech. - Semester - VIII**

**(Credit System New Syllabus w.e.f. 2019-20)**

**(Time :- 11.00 a.m. To 12.00 p.m.)**

**Exam Type :- MCQ**

| Day & Date | Branches | Paper | Code |
|---|---|---|---|
| 17.10.2020 Saturday | 1. Electronics & Comm. Technology | Broadband Communication | 74240 |
| | 2. Computer Science & Technology | Mobile Technology | 74208 |
| | 3. Chemical Technology | Energy Resources and utilization | 74231 |
| | 4. Mechanical Engineering | Automobile Engineering | 74272 |
| | 5. Food Technology | Post Harvest Technology of Plantation Crops | 74259 |
| | 6. Civil Engineering | Design of RCC Structures - II | 74287 |
| 19.10.2020 Monday | 1. Electronics & Comm. Technology | Satellite and Radar Engineering | 72241 |
| | 2. Computer Science & Technology | Information Security | 74209 |
| | 3. Chemical Technology | Process Economics and Project Engineering | 74232 |
| | 4. Mechanical Engineering | Total Quality Management | 74275 |
| | 5. Food Technology | Design and Development of New Products | 74260 |
| | 6. Civil Engineering | Town and Country Planning | 74289 |
| 20.10.2020 Tuesday | 1. Electronics & Comm. Technology | Optical Fiber Communication | 74242 |
| | 2. Computer Science & Technology | Soft Computing | 74210 |
| | 3. Chemical Technology | Special Chemical Technologies | 74233 |
| | 4. Mechanical Engineering | Mechatronics and Robotics | 74274 |
| | 5. Food Technology | Waste Management of Food Industries | 74261 |
| | 6. Civil Engineering | Construction Practices | 74288 |
| 21.10.2020 Wednesday | 1. Electronics & Comm. Technology | Mobile Communication | 74243 |
| | 2. Computer Science & Technology | Big Data Technology | 74211 |
| | | Data Mining and Warehousing | 74212 |
| | | Service Oriented Architecture | 74213 |
| | 3. Chemical Technology | Transport Phenomena | 74234 |
| | 4. Mechanical Engineering | Power Plant Engieering | 74273 |
| | 5. Food Technology | Food Plant Design and Layout | 74266 |
| | 6. Civil Engineering | Advanced Design of Structures | 74290 |
| | | Advanced Geotechnical Engineering | 74291 |
| | | Development Engineering | 74292 |
| | | Design of Concrete Bridges | 74293 |
| | | Structural Dynamics | 74294 |

| | | | |
|---|---|---|---|
| **22.10.2020 Thursday** | 1. Electronics & Comm. Technology | Fuzzy Logic and Applications | 74244 |
| | | High Speed Digital Design | 74245 |
| | | Digital Image Processing | 74246 |
| | | Biomedical Instrumentation and Technology | 74247 |
| | | RF Circuit Design | 74248 |
| | | Software Defined Radio | 74249 |
| | | Remote Sensing and GIS | 74250 |
| | | Machine Learning | 74251 |
| | 2. Computer Science & Technology | Industrial Management | 74214 |
| | | Real Time Operating System | 74215 |
| | | Optimization Techniques | 74216 |
| | 3. Chemical Technology | Petrochemical Technology | 74221 |
| | | Industral Biotechnology | 74222 |
| | | Polymer Technology | 74223 |
| | | Food Process Technology | 74224 |
| | | Interfacial Science and Engineering | 74225 |
| | | Environmental Chemistry and Biochemistry | 74226 |
| | | Advanced Material | 74227 |
| | | Project Management | 74228 |
| | | Applications in Chemical Processes | 74229 |
| | 4. Mechanical Engineering | Vibration and Noise | 74277 |
| | | Nano Technology | 74278 |
| | | Machine Tool Design | 74279 |
| | | Industrial Automation and Robotics | 74280 |
| | | Open Elective | 74281 |
| | | Computational Fluid Dynamics | 74276 |
| | 5. Food Technology | Flavors Technology | 74262 |
| | | Snack Foods Technology | 74263 |
| | | Sugar Technology | 74264 |
| | | Energy Systems and Technology | 74265 |
| | 6. Civil Engineering | Engineering Optimization | 74295 |
| | | Engineering Economics and Valuation | 74296 |
| | | Finite Element Method | 74297 |
| | | Numerical Methods | 74298 |
| | | Remote Sensing and GIS Application | 74299 |

Sd/-

Engg. & Tech. Exam Section
Date - 10/10/2020

Shri . G. R. Palse
I/c. Director,
Board of Exainations and Evaluations.